भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०११-१२/९७**
**डीजीबीए.जीएडी.क्र.एच.३/३१.१२.०१०/२०११-१२** **१ जुलै २०११**

सर्व एजन्सी बँका

महोदय/महोदया,

**एजन्सीबँकांद्वारे सरकारी व्यवहार करण्यावरील महापरिपत्रक - एजन्सी कमिशनचे प्रदान**

बँकांना एजन्सी कमिशन दिले जाण्याबाबतच्या निरनिराळ्या सूचना, भारतीय रिझर्व बँक वेळोवेळी देत आली आहे. ह्या सूचना आमचे महापरिपत्रक आरबीआय/२००९-१०/८९(डीजीबीए.जीएडी.क्र.एच.४/३१.१२.०१०/२०१०-११ दि. जुलै १, २०१०) मध्ये दिल्या आहेत. सुधारित महापरिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. हे परिपत्रक रिझर्व बँकेच्या www.mastercirculars.rbi.org.in वर ही पाहता येईल.

कृपया पोच द्यावी.

आपला
(बी.के. मिश्रा)
महाव्यवस्थापक
सोबत - वरीलप्रमाणे

यह विभाग आयएसओ ९००१-२००० प्रमाणित आहे
डिपार्टमेंट ऑफ गव्हर्मेंट अँड बँक अकाउंट्स, केंद्रीय कार्यालय, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४०००००८,
टेलिफॉन : (०२२) २३०८ ४१२१, फॅक्स क्र. (०२२) २३०० ०३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५, ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

**एजन्सी कमिशनवरील महापरिपत्रक**

**१) एजन्सी कमिशन - सुधारित दर**

**[आरबीआय/२००५-०६/७७ (आमचेः डीजीबीए.जीएडी. क्र. ३७९/३१.१२.०१० (सी)/२००५-०६) दि जुलै २५, २००५]**

**[आरबीआय/२००५-०६/३८४(आमचेः डीजीबीए.जीएडी. क्र. १७५८५/३१.१२.०१० (सी)२००५-०६) दि मे ८, २००६]**

जुलै ०१, २००५ पासून [आमचे परिपत्रक आरबीआय/२००५-०६/७७(डीजीबीए.जीएडी.क्र.३७९/३१.१२.०१०/ (सी)/२००६ - ०६ दि. जुलै २५, २००५] एजन्सी बँकांना देय असलेले एजन्सी कमिशन, उलाढाल (मूल्य) धर्ती ऐवजी व्यवहारांच्या धर्तीवर देण्याबाबत सुधारित करण्यात आले आहे. बँकांकडून आलेल्या अर्जा विनंतीनुसार त्याचा आढावा घेण्यात आला आणि त्यानुसार त्याबाबतचे दर जुलै ०१, २००५ पासून पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ) रिसीट्स | .... | रु ४५/- प्रति व्यवहार |
| ब) पेन्शनसोडून अन्य प्रदान | .... | प्रति रु १००/- उलाढालीसाठी ९ पैसे |
| क) पेन्शन प्रदान | .... | रु ६०/- प्रति व्यवहार |

बँकांद्वारे पेन्शनरांना दिल्या जाणाऱ्या सेवेच्या गुणवत्तेनुसार एजन्सी बँकांनी दिलेल्या सेवेची गुणवत्ता ठरविली जाईल.

रिसीट्स व पेन्शन प्रदान ह्यावरील एजन्सी कमिशन 'प्रति व्यवहारावर' देय असल्याने, असे कमिशन मागण्यासाठी असलेले रेकॉर्ड, रिझर्व बँक किंवा तिचे प्राधिकृत प्रतिनिधींना कोणत्याही वेळी उपलब्ध करुन देण्यासाठी सांभाळून ठेवण्यास बँकांना सांगण्यात आले होते. व्यवहारांची संख्या काढण्यासाठी, सरकारी लेखा प्राधिकरणाला दिलेला दैनंदिन बँक स्क्रोल वैध धरला जाईल. 'एरर स्क्रोल्स' मधील व्यवहारांसाठी एजन्सी कमिशन दिले जाणार नाही. निरनिराळ्या करांबाबतची वसुली/प्रदानाबाबत असलेली बँकेची स्वतःची वैधानिक जबाबदारी एजन्सी कमिशनसाठी मात्र अणसार नाही. कमिशनची मागणी करताना तशा प्रकारचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र बँकांनी सादर करावे.

**२. एजन्सी कमिशन - सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९९८(पीपीएफ) व वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४(एससीएसएस)**

**[आरबीआय /२००६-०७/२८९ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१४०२४/३१.१२.०१०/ २००६-०७) दि मार्च १६, २००७]**

पीपीएफ व एससीएसएस हाताळण्याबाबत रिझर्व बँकेने द्यावयाच्या एजन्सी कमिशनच्या प्रश्नावर भारत सरकारचा सल्ला घेऊन परीक्षण केले गेले आणि पीपीएफ व एससीएसएसखाली व्यवहार हाताळण्यासाठी बँकांना द्यावयाच्या मानधनासाठी केवळ एकाच वाहिनीचा उपयोग करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार, पीपीएफ व एससीएसएस संबंधीच्या व्यवहारांवर भारतीय रिझर्व बँक पुढील दराने एजन्सी कमिशन देईल.

अ) रिसीट्स - रु ४५/- प्रति व्यवहार

ब) प्रदान - रु १००/- च्या प्रत्येक उलाढालीवर ९ पैसे.

वर दिल्यानुसार दर सुधारित केल्याने भारत सरकार पीपीएफ व एससीसीएस हाताळण्यासाठी मोबदला देणे बंद करील.

**३. पीपीएफ व एससीएसएस व्यवहारांवर बँकांद्वारे एजन्सी कमिशन मागणे**

**[आरबीआय/२००६-०७/४०८ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१६५३२ /१५.१५.००१ /२००६-०७) दि मे २१, २००७]**

पीपीएफ व एससीएसएससंबंधाने एजन्सी कमिशन मागण्याबाबतच्या कार्यरीतीत एकसमानता आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे देण्यात आली होती व एजन्सी कमिशन मागण्याबाबत नमुना विहित करण्यात आला होता. पीपीएफ व एससीएसएसवर देय असलेले एजन्सी कमिशनची मागणी करण्याबाबत, सर्व एजन्सी बँकांना जोडपत्र १ व जोडपत्र २ मध्ये दिलेल्या नमुन्यात तसे करण्यास आणि अशा मागण्यांचा सारांश जोडपत्र ३ नुसार करण्यास सांगण्यात आले होते. पीपीएफवरील एजन्सी कमिशन जुलै १, २००५ पासून व एससीएसएसवरील एजन्सी कमिशन एप्रिल १, २००६ पासून देय आहे. मार्च ३१, २००७ पर्यंतचे येणे आणि मागण्या एजन्सी बँकांद्वारे उशीरात उशीरा जून १०, २००७ पर्यंत सादर केल्या जाव्यात. देय असलेल्या एजन्सी कमिशनसाठी केवळ एकच वाहिनी असल्याने, भारत सरकारद्वारे आधीच दिले गेलेला मोबदला ह्या बँकेकडून वसुल केले जाईल.

## ४. एजन्सी कमिशनसाठी पात्र असलेले सरकारी व्यवहार

**[आरबीआय/२००४/३०५ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच--२६२५ -२६५८/ ३१.१२.०१०(सी)/२००४-०५) दि डिसेंबर १७, २००४]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच--८८५२ /३१.१२.०१०(सी)/२०१०-११ दि जून २१ , २०११]**

एजन्सी बँकांनी केलेले पुढील व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र असतील :

- केंद्र/राज्य सरकारांच्या वतीने केलेल्या रेव्हेन्यु रिसीट्स व प्रदाने.
- केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या बाबतीत केलेली पेन्शन प्रदाने
- विशेष ठेव योजना, १९७५ (एसडीएस) व सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी (पीपीएफ) योजना
- वरिष्ठ नागरिक बचत योजना (एससीएसएस)
- एजन्सी कमिशनसाठी पात्र असलेली, रिझर्व बँकेनेविशेषत्वाने सांगितलेली कोणतीही योजना (उदा. रिलीफ बॉड्स इत्यादिंचे व्यवहार)

वित्तीय संस्था व बँका ह्यांच्याकडून थेट केलेली लघु मुदत/दीर्घ मुदतीची कर्जे, एजन्सी कमिशनसाठी पात्र नाहीत कारण, हे व्यवहार सर्वसाधारण बँक व्यवहारांच्या स्वरुपाचे समजले जात नाहीत. सार्वजनिक कर्ज हाताळण्यासाठी/व्यवस्थापनासाठी, रिझर्व बँक, एजन्सी बँकांना, एजंट म्हणून काम करण्यास, ठरविल्याप्रमाणे वेगळा मोबदला देत असते. येथे पुनश्च सांगण्यात येते की, मंत्रालये/विभाग इत्यादींच्या वतीने उघडलेल्या पतपत्रांच्या (एलसी) बाबतीत निर्माण झालेले व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र नसतील.
तथापि काही एजन्सी बँकांनी दिलेल्या संदर्भांचा विचार करता, बँकांनी मुद्रांक शुल्क गोळा करण्याबाबत एजन्सी कमिशन देण्याबाबतचा प्रश्न आमच्याकडून तपासला गेला असून, बँकांद्वारे मुद्रांक शुल्क गोळा केले जाण्याबाबतचे सरकारी व्यवहार, पुढीलप्रमाणे एजन्सी कमिशनसाठी पात्र ठरतील :
१) जेथे एजन्सी बँका प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रोनिक पध्दतीने मुद्रांक शुल्क गोळा करतात तेथे एजन्सी कमिशन देणे लागु होईल. मात्र तेव्हा बँकांनी जनतेकडून त्यासाठी कोणताही आकार घेतलेला नसावा किंवा हे काम करण्यासाठी राज्य सरकारकडून मोबदला घेतलेला नसावा.
२) फ्रँकिंग करण्याबाबत, राज्य सरकारद्वारे त्या एजन्सी बँकेला फ्रँकिंग व्हेंडर म्हणून नेमलेले असते आणि ती बँक कागदपत्रांचे फ्रँकिंग करण्यासाठी जनतेकडून मुद्रांक शुल्क गोळा करत असते. राज्य सरकार त्या बँकेला एक फ्रँकिंग व्हेंडर म्हणून कमिशन देत असल्याकारणाने ती बँक एजन्सी कमिशनसाठी पात्र ठरत नाही. तथापि, फ्रँकिंग बारच्या खरेदीसाठी, चलानद्वारे प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने ट्रेझरीमध्ये जमा करण्यासाठी, फ्रँकिंग व्हेंडरने दिलेले मुद्रांक

शुल्क गोळा करणारी एजन्सी बँक एजन्सी कमिशन मिळविण्यासाठी पात्र असेल - कारण, वरील बाब (१) मध्ये दिल्याप्रमाणे ते मुद्रांक शुल्काचे करावयाचे नियमित प्रदान असेल.

सर्व एजन्सी बँकांनी, टर्नओव्हर कमिशनची (टीओसी) मागणी करतेवेळी, अपात्र असलेल्या व्यवहारांवर टीओसी मागण्यात आलेले नाही असे प्रमाणपत्र द्यावे.

**५. एजन्सी बँकांद्वारे, आयकर/इतर थेट कर आणी राज्य सरकारचा व्यवसाय कर/इतर कर स्वीकरण्याची योजना**

**[आरबीआय/२००४/६४ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच--४१/४२.०२.००१/२००३-०४ दि जुलै २२, २००४]**

**[आरबीआय/२००४/२४८(संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच--१२२५-१२५८/४२.०२.००१/२००४-०५) दि ऑक्टोंबर २७, २००४]**

**[आरबीआय/२००४-०५/३४४(संदर्भःडीजीबीए.जीएडी.क्र.एच--३५६८-३६०१/४२.०१.००१/२००४-०५) दि जानेवारी १३, २००५]**

अशा एजन्सी बँका की ज्यांची स्वतःची प्राधिकृत थेट कर गोळा करण्यासाठी शाखा नाही व ज्या त्यांच्या कराबाबतच्या जबाबदाऱ्यांचे प्रदान त्यांच्या स्वतःच्या शाखांद्वारे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या प्राधिकृत शाखा किंवा भारतीय रिझर्व बँकेच्या कार्यालयांद्वारे करतात त्यांनी त्याबाबत स्क्रोलमध्ये तसे वेगळे निर्देशित करावे. असे व्यवहार एजन्सी कमिशनसाठी पात्र असणार नाहीत. बँकांनी प्रमाणपत्र सादर करावे की, त्यांने स्वतःचे कर (टीडीएस, कॉर्पोरेशन टॅक्स इत्यादि) एजन्सी कमिशन मागतेवेळी वगळलेले आहेत.

**६. एजन्सी कमिशनमधून टीडीएस कापला जाणे**
**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९०/३१.१२.०१०/२००३-०४ दि सप्टेंबर १४, २००३]**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६६७०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ दि मार्च २४, २०११]**

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसद्वारा ठरविण्यात आले आहे की त्यांना दिलेल्या एजन्सी कमिशनमधून किंवा त्यांनी त्यांच्या एजंटांना दिलेल्या कमिशनमधून कर कापण्याची आवश्यकता नाही. सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस ह्यांनी त्यांचे ऑफिस मेमोरँडम एफ.क्र. २७५/२०/२०११-आयटी (बी) दि. १४ मार्च २०११ अन्वये स्पष्ट केले आहे की 'केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या सर्वसाधारण बँकिंग व्यवसायासाठी केलेल्या व्यवहारांबाबत, एजन्सी बँकांना दिलेल्या किंवा त्यांनी त्यांच्या एजंटांना दिलेल्या टर्नओव्हर कमिशनवर कर कापला जाणार नाही', तथापि येथे पुनश्च सांगण्यात येते की, संबंधित बँकांच्या हातामधील एजन्सी कमिशन हे करपात्र असेल कारण ते बँकेच्या उत्पन्नाच्या एक भाग असेल.

**७. एजन्सी बँकांद्वारे सरकारी व्यवसाय चालविला जाणे - एजन्सी कमिशनचे प्रदान - बँकांद्वारे एजन्सी कमिशनची मागणी करण्याचा नमुना**

**[आरबीआय/२००५/१४७ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७५१/३१.१२.०१० (सी)/२००५-०६) दि ऑगस्ट ३०, २००५ आणि**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९३७८/३१.१२.०१० (सी)/२००५-०६ दि जून ६, २००६]**

एजन्सी बँकांद्वारे (एसबीआय सोडून) एजन्सी कमिशनची मागणी करण्यासाठीचा नमुना तयार करण्यात आला आहे. ह्याशिवाय, रिलिफ बाँड/सेव्हिंग्ज बाँडच्या बाबतीत व्याज प्रदान आणि/किंवा विमोचन मूल्याचे प्रदान करण्याबाबत एजन्सी कमिशनची मागणी करण्याबाबतचा नमुनाही तयार करण्यात आला आहे. एजन्सी बँकांनी एजन्सी कमिशनची मागणी विहित नमुन्यातच करणे आवश्यक आहे.

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७५४/३१.१२.०१० (सी)/२००५-०६ दि ऑगस्ट ३०, २००५]**

भारतीय स्टेट बँकने तिची मागणी, वरील दि. जून ६, २००६ च्या परिपत्रकानुसार सुधारित आमचे पत्र डीजीबीए.जीएडी.क्र.एच-७५४/३१.१२.०१० (सी)/२००५-०६ दि ऑगस्ट ३०, २००५ मध्येविहित केलेल्या नमुन्यामध्ये सादर करावी.

**८. एजन्सी बँकांद्वारे सादर केलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या - सर्वसामान्य अनियमितता - चुकीच्या मागण्यांसाठी दंडात्मक व्याज आकारणी**

**[आरबीआय/२००५/१९३ (संदर्भःडीजीबीए.जीएडी.क्र.एच-४५३०/३१.१२.०१०(सी)/२००५-०६) दि ऑक्टोंबर २७, २००५]**
**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११११३६/३१.१२.०१०(सी)/ २००५-०६दि जानेवारी ३१, २००६]**
**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१३११८/३१.१२.०१० (सी)/ २००५-०६ दि मार्च २, २००६]**

काही एजन्सी बँकांनी सादर केलेल्या एजन्सी कमिशन मागण्यांची वरवर छाननी केली असताना आढळलेल्या सर्वसामान्य अनियमितांबाबत एजन्सी बँकांना कळविण्यात आले होते. एजन्सी कमिशनची मागणी करतेवेळी योग्य ती काळजी घेणे तसेच त्या बरोबर आहेत ह्याची बँकांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे चुकीच्या मागण्या टाळण्यासाठी, दिलेली माहिती त्यांनी त्यांच्या अंतर्गत/कॉंकरंट ऑडिटरकडून प्रमाणित करुन घ्यावी. तडजोड झालेल्या चुकीच्या एजन्सी कमिशनसाठी एजन्सी बँकांना दंडात्मक व्याज बँक-दराने (आरबीआयने दर वर्षी १ मे व १ नोव्हेंबर रोजी अधिसूचित केल्याप्रमाणे) द्यावे लागेल.

**९. विशेष ठेव-योजनांवरील एजन्सी कमिशन**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच-११७९४/३१.१२.०१० (सी)/ २००५-०६ दि फेब्रुवारी १३, २००६]**

एसडीएस- १९७५ खाली केलेले व्यवहार, ' पेमेंट्स अदर दॅन पेन्शन' प्रमाणेच आहेत. त्यामुळे, अशा व्यवहारांवर प्रति रु १००/- च्या उलाढालीवर ९ पैसे ह्या दराने एजन्सी कमिशन मिळविण्यास एजन्सी बँका पात्र आहेत. ह्या योजनेखाली नवीन ठेवी घेण्यास परवानगी नसल्याने, एसडीएस-१९७५ वरील चालु व्यवहार पुढीलप्रमाणे असतील -

अ) ह्या फंडाकडून ह्याबाबत विनंती आल्यास निकासी करण्यास परवानगी देणे
ब) वार्षिक दराने व्याजप्रदान करणे आणि
क) योजनेमध्ये खाते बंद केले जाणे.

**१०. पेन्शन - व्यवहारांवर एजन्सी कमिशन**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१३०३४/३१.१२.०१०(सी)/ २००६-०७ दि फेब्रुवारी २७, २००७]**

एजन्सी बँकेद्वारे पेन्शनची आकडेमोड/हिशेब करण्यासह पेन्शनचे वाटप करणे असे संपूर्ण काम केले जात असल्यास, पेन्शन व्यवहारांसाठी रु ६०/- प्रति व्यवहार एवढे एजन्सी मिळविण्यास एजन्सी बँका पात्र आहेत. पेन्शनचा हिशेब करणे

इत्यादि कामे संबंधित सरकारी विभाग/ट्रेझरी द्वारे केले जात असून, केवळ तेवढी रक्कम पेन्शनरांच्या खात्यात जमा करण्याचे काम बँक शाखा, सरकारी खात्यात केवळ एकच डेबिट करुन करत असल्यास त्या एजन्सी बँका प्रति रु १००/- उलाढालीवर ९ पैसे एजन्सी कमिशन मिळविण्यास पात्र असतील.

**११. एजन्सी कमिशनच्या मागणीत अवास्तव वाढ**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच_१८००/३१.१२.०१०(सी)/ २००९-१० दि ऑगस्ट २१, २००९]**

भारतीय रिझर्व बँकेची प्रादेशिक कार्यालये/केंद्रीय लेखा विभाग नागपुर येथे विहित नमुन्यात पाठविलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या बरोबर आहेत ह्याची खात्री एजन्सी बँकांनी करुन देणे आवश्यक आहे. ह्याशिवाय, चुकीच्या मागण्णा टाळण्यासाठी, बँकशाखांनी त्यांच्या मागणी - अर्जात दिलेली माहिती त्यांच्या अंतर्गत कॉंकरंट ऑडिटर्सनी प्रमाणित केलेली असावी. तथापि, आमच्या प्रादेशिक कार्यालयांद्वारा कळविण्यात आले आहे की काही एजन्सी बँकांनी, त्यांच्या अंतर्गत कॉंकरंट ऑडिटर्सनी प्रमाणित केलेल्या मोठ्या रकमांच्या चुकीच्या मागण्या सादर केल्या आहेत. अशा चुकीच्या मागण्या अंतर्गत कॉंकरंट ऑडीटर्सद्वारा प्रमाणित केल्या गेल्यास त्रैमासिक मागण्या करण्यातील आवश्यक अटीच्या गरजेचा हेतूच नष्ट होईल. ह्याचा विचार करता, संबंधित शाखांनी आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे पाठविलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या बरोबर असल्याची खात्री करुन घेण्यासाठी एजन्सी बँकांना विनंती करण्यात येत आहे. एजन्सी बँकांना असेही सांगण्यात आले होते की त्यांनी, संबंधित शाखांच्या अंतर्गत तपासणी/ऑडिट दरम्यान, एक/दोन वर्षांच्या कालावधीतील सादर केल्या गेलेल्या एजन्सी कमिशन मागण्यांची अचानक तपासणी करण्याची व्यवस्था करावी. एजन्सी बँकांनी ह्यावर देखरेख करुन त्याबाबतच्या प्रगतीचा नियतकालिक आढावा घेणे आवश्यक आहे.

**१२. बाह्य ऑडिटरद्वारे प्रमाणित करावयाच्या एजन्सी कमिशनच्या मागण्या**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच_३९०३/३१.१२.०१०(सी)/२००९-१० दि नोव्हेंबर ११, २००९]**

आमच्या नजरेस आले आहे की, सूचना देऊनही आमच्या प्रादेशिक कार्यालयांकडे एजन्सी बँकांनी केलेल्या चुकीच्या/अवास्तव मागण्या येणे सुरुच आहे. ह्यामुळे असे ठरविण्यात आले आहे की, ह्यापुढे एजन्सी बँकांनी केलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या सादर करण्यापूर्वी बाह्य ऑडिटरद्वारा (चार्टर्ड अकाउंटंट) ऑडिट व प्रमाणित केल्या जाव्यात. येथे बाह्य ऑडिटर हा कॉंकरंट ऑडिटर/स्टॅटयुटरी ऑडिटर आहे तेथे अशा कॉंकरंट ऑडिटर/स्टॅटयुटरी ऑडिटरद्वारा अशा मागण्या प्रमाणित केल्या जाऊ शकतात. त्यानुसार, एजन्सी बँकांना सांगण्यात आले होते की, आमच्या प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करावयाच्या सर्व मागण्या/दावे, एखाद्या बाह्य ऑडिटारकडून (चार्टर्ड अकाउंटंट) प्रमाणित केले जावेत. ह्याशिवाय, एजन्सी बँकांचे अंतर्गत तपासणी/ऑडिटर्स ह्यांनी, त्यांच्या शाखांनी सादर केलेल्या एजन्सी कमिशनच्या मागण्या पडताळून पाहून, तपासणी ऑडिट दरम्यान त्यांच्या खरेपणाबाबत खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

**१३. बाह्य ऑडिटरने प्रमाणित करावयाचे एजन्सी कमिशनचे दावे/मागण्या**

**[डीजीबीए.जीएडी.क्र.एच_१६०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ द जुलै_७, २०१०]**

एजन्सी बँकांना सांगण्यात आले होते की, त्यांनी त्यांचे एजन्सी कमिशनचे दावे/मागण्या आरबीआयला सादर करण्यापूर्वी एखाद्या बाह्य ऑडिटरकडून (चार्टर्ड अकाउंटंट) तपासून व प्रमाणित करुन घ्यावेत, तथापि, अशा बाह्य ऑडिटरच्या प्रमाणपत्रात इतर बाबींबरोबर पुढील बाबी निर्देशित केल्या जाव्यात :

अ) ‘रिसीट’ व ‘पेन्शन प्रदान व्यवहार’ ह्यासह, आरबीआयला द्याव्याच्या एजन्सी कमिशन मागणीच्या अर्जात निर्देशित केलेले ‘पेन्शन प्रदान सोडून अन्य प्रदाने’ साठीचे एजन्सी कमिशनचे दावे त्या एजन्सी बँकेच्या संबंधित शाखांमध्ये ठेवलेल्या रेकॉर्ड्सबरोबर पडताळून पाहिले जावेत. आणि

ब) आकारमानाच्या (संख्या) आधारावर केलेल्या एजन्सी कमिशनच्या दाव्यांबाबत (उदा. ‘रिसीट’ व ‘पेन्शन प्रदान व्यवहार’) ते केवळ एकदाच आकारण्यात आले असून, ‘पेन्शन प्रदाने सोडून अन्य प्रदाने’ च्या बाबतीत असलेले मूल्य-आधारित व्यवहार काढताना त्वे वगळले जावेत.

**ह्या महापरिपत्रकात समाविष्ट केलेल्या परिपत्रकांची यादी**

| अनु.क्र. | परिपत्रक क्रमांक | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | डीजी बीए.जीएडी.क्र.एच-१९०/ ३१.१२.०१० /२००३-०४ | सप्टेंबर १४, २००३ | आरबीआयद्वारे एजन्सी कमिशनवर टीडीएस लावला जाणार नाही. |
| २. | आरबीआय/२००४/६४(संदर्भःडीजीबीए.जीएडी.क्र.एच-४१/४२.०२.००१/२००३-०४) | जुलै २२, २००४ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ३. | आरबीआय/२००४/२४८ (संदर्भः डीजीबीए.जीएडी.क्र. एच-१२२५-१२५८/४२.०२.००१ /२००४-०५) | ऑगस्ट २७, २००४ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ४. | आरबीआय/ २००४/३०५ (संदर्भः डीजीबीए.जीएडी. क्र. एच-२६२५-२६५८ /३१.१२.०१० (सी) /२००४-०५) | डिसेंबर १७, २००४ | एजन्सी बँकांद्वारे सरकारी व्यवसाय चालविण्याबाबत मोबदला - टर्नओव्हर कमिशन देणे |
| ५. | आरबीआय/२००४-०५/३४४ (संदर्भः डीजीबीए.जीएडी. क्र. एच-३५६८ - ३६०१/ ४२.०१.००१/ २००४-०५) | जानेवारी १३, २००५ | एजन्सी बँकांद्वारे आयकर व इतर कर (केंद्र सरकार) आणि राज्य सरकारांचे व्यवसाय कर/इतर कर स्वीकारण्याची योजना |
| ६. | आरबीआय/२००५०६/७७(संदर्भःडीजीबीए.जीएडी.क्र.३७९/ ३१.१२.०१० (सी) /२००५-०६) | जुलै २५, २००५ | एजन्सी कमिशन - दरांमध्ये सुधारणा |
| ७. | आरबीआय/२००५/१४७(संदर्भः डीजीबीए.जीएडी. क्र. एच-७५१/ ३१.१२.०१०(सी) २००५-०६)<br>डीजीबीए.जीएडी. क्र. एच-७५४/ ३१.१२.०१० (सी) २००५-०६<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१९३७८/ ३१.१२.०१० (सी)/ २००५-०६ | नोव्हेंबर ३०, २००५<br>नोव्हेंबर ३०, २००५<br>जुन ६, २००६ | बँकांद्वारे एजन्सी कमिशन मागणीबाबतचा नमुना |

**ह्या महापरिपत्रकात समाविष्ट केलेल्या परिपत्रकांची यादी**

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | आरबीआय/ २००५/१९३ (संदर्भः डीजीबीए.जीएडी. क्र. एच ४५३० /३१.१२.०१० (सी)/२००५-०६)<br>डीजीबीए.जीएडी. क्र. एच- ११९३६/ ३१.१२.०१० (सी) /२००५-०६ आणि<br>डीजीबीए.जीएडी.क्र.एच-१३११८/ ३१.१२.०१० (सी) /२००५-०६ | ऑगस्ट २७, २००५<br>जानेवारी ३१, २००६<br>मार्च २, २००६ | एजन्सी बँकांद्वारे सादर केलेले दावे - सर्वसामान्य अनियमितता |
| ९. | डीजीबीए.जीएडी. क्र. एच- ११७९४/ ३१.१२.०१० (सी)/२००५-०६ | फेब्रुवारी १३, २००६ | विशेष ठेव योजनेवर एजन्सी कमिशन |
| १०. | आरबीआय/२००५०६/३८४(संदर्भःडीजीबीए.जीएडीक्र.१७५ ८५/ /३१.१२.०१०(सी)/२००५-०६) | मे ८, २००६ | सरकारी व्यवसाय चालविणे - एजन्सी कमिशन - सुधारित दर |
| ११. | डीजीबीए.जीएडी.एच-१३०३४/ ३१.१२.०१०(सी)/२००६-०७ | फेब्रुवारी २७, २००७ | पेन्शन प्रदानाबाबत एजन्सी कमिशन |
| १२. | आरबीआय/२००६-०७/२८९ (संदर्भः डीजीबीए. जीएडी.क्र. एच-१४०२४/ ३१.१२.०१०/ २००६-०७) | मार्च १६, २००७ | सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८ (पीपीएफ) आणि वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ (एससीएसएस) ह्यावर एजन्सी कमिशन |
| १३. | आरबीआय/२००६-०७/४०८ (संदर्भः डीजीबीए.सीडीडी. क्र.एच -१६५३२/ १५.१५.००१/२००६-०७) | मे २१, २००७ | पीपीएफ व एससीएसएस वर एजन्सी कमिशन मागणीचा नमुना |
| १४. | डीजीबीए.जीएडी.एच-१८००/३१.१२.०१० (सी)/ २००९-१० | नोव्हेंबर २१, २००९ | एजन्सी कमिशन दाव्यांमध्ये अवास्तव वाढ |
| १५. | डीजीबीए.जीएडी.एच-३९०३/ ३१.१२.०१०(सी)/२००९-१० | नोव्हेंबर ११, २००९ | बाह्य ऑडिटर/चार्टर्ड अकाउंटंटद्वारा एजन्सी कमिशनच्या मागण्या प्रमाणित केल्या जाणे. |
| १६. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच.१६०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | जुलै ७, २०१० | बाह्य ऑडिटर/चार्टर्ड अकाउंटंटद्वारा एजन्सी कमिशनच्या मागण्या प्रमाणित केल्या जाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-६६७०/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | मार्च २४, २०११ | आरबीआयद्वारे एजन्सी कमिशनवर टीडीएस लावला जाणार नाही. |
| १८. | डीजीबीए.जीएडी.क्र.एच-८८५२/३१.१२.०१०(सी)/२०१०-११ | जुन २१ , २०११ | पंजीकरण शुल्क व मुद्रांक शुल्कावर एजन्सी कमिशन देणे |